## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र.रामाआ/नाशिक/तक्रार क्रमांक :- २१/२०१७/नंदुरबार मधील शास्तीचे प्रकरण**

१ श्री. देवमन नारायण आहेरराव, : अपिलार्थी
मु. पो. खांडबारा,
ता. नवापूर, जि. नंदुरबार.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद कार्यालय, नंदुरबार,
ता. जि. नंदुरबार.

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद कार्यालय, नंदुरबार,
ता. जि. नंदुरबार.

**विवेचन**

तक्रारदार, श्री. देवमन नारायण आहेरराव यांनी द्वितीय अपील क्रमांक ३००/२०१५/नंदुरबार मधील दिनांक २०/०४/२०१७ रोजीच्या निर्णयाच्या अनुषंगाने माहिती प्राप्त न झाल्याने दिनांक १६/०८/२०१७ रोजी तक्रार दाखल केली आहे. उपरोक्त तक्रारीमध्ये आयोगाने दिनांक २६/०३/२०१९ रोजी खालीलप्रमाणे निर्णय पारित केला आहे:-

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद कार्यालय, नंदुरबार यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक ०६/०९/२०१४ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन आयोगाच्या आदेशानुसार सुमारे ०१ वर्ष ८ महिने उशिराने माहिती पुरविल्याचे स्पष्ट होते. म्हणून त्यांचेविरुद्ध माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २०(१) अन्वये रुपये २५,०००/- शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ

नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

सदर आदेशास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद कार्यालय, नंदुरबार, श्री. राजधर लखा माळी यांनी आयोगाकडे दिनांक २२/०५/२०१९ रोजीच्या पत्रान्वये लेखी खुलासा सादर करुन असे नमूद केले आहे की, आयोगाकडील द्वितीय अपील सुनावणी आदेश झाला त्या कालावधीत मी सहा. शिक्षण उप निरीक्षक म्हणुन बदलीने शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद, जळगांव येथे दिनांक ०९/०८/२०१५ पासुन कार्यरत आहे. त्यामुळे सदर कालावधीत मी विद्यमान जन माहिती अधिकारी म्हणुन कामकाज केलेले नाही. श्री. जयस्वाल यांची उप शिक्षणाधिकारी म्हणुन जिल्हा परिषद, बीड येथे बदली झालेली असल्याने त्यांना दिनांक १५/०१/२०१५ रोजी कार्यमुकत केले असल्यामुळे माझ्याकडे उप शिक्षणाधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार दिनांक १५/०१/२०१५ ते दिनांक ०८/०७/२०१५ पर्यंत होता. आयोगाच्या आदेशानुसार सदर कालावधीत विद्यमान जन माहिती अधिकारी म्हणुन श्री. तेजराव गाडेकर हे उप शिक्षणाधिकारी दिनांक ०४/०२/२०१७ ते दिनांक ०६/०८/२०१७ पर्यंत कार्यरत होते. तरी, प्रस्तुत प्रकरणात त्यांना जबाबदार न धरता त्यांचा खुलासा मान्य करण्यात येऊन त्यांचेविरुध्द शास्तीची कार्यवाही करण्यात येऊ नये, अशी विनंती केली आहे.

प्रस्तुत तक्रारीसंदर्भातील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, या प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद कार्यालय, नंदुरबार, श्री. राजधर लखा माळी यांनी आयोगाकडील द्वितीय अपील सुनावणी आदेश झाला त्या कालावधीत ते सहा. शिक्षण उप निरीक्षक म्हणुन बदलीने शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद, जळगांव येथे दिनांक ०९/०८/२०१५ पासुन कार्यरत असल्यामुळे सदर कालावधीत त्यांनी विद्यमान जन माहिती अधिकारी म्हणुन कामकाज केलेले नसुन श्री. जयस्वाल यांची उप शिक्षणाधिकारी म्हणुन जिल्हा परिषद, बीड येथे बदली झालेली असल्याने त्यांना दिनांक १५/०१/२०१५ रोजी कार्यमुकत केले असल्यामुळे त्यांचेकडे उप शिक्षणाधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार दिनांक १५/०१/२०१५ ते दिनांक ०८/०७/२०१५ पर्यंत असुन आयोगाच्या आदेशानुसार सदर कालावधीत विद्यमान जन माहिती अधिकारी म्हणुन श्री. तेजराव गाडेकर हे उप शिक्षणाधिकारी दिनांक ०४/०२/२०१७ ते दिनांक ०६/०८/२०१७ पर्यंत कार्यरत असल्याचे नमुद केले. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदारास माहिती देण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे दिसुन येत नाही. सबब, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक),

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

जिल्हा परिषद कार्यालय, नंदुरबार, श्री. राजधर लखा माळी यांनी दिनांक २२/०५/२०१९ अन्वये सादर केलेला खुलासा मान्य करण्यात येत असून त्यांनी याबाबत केलेला खुलासा समर्थनीय आहे. म्हणून त्यांचेवर अधिनियमातील कलम २०(१) नुसार शास्तीची कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद कार्यालय, नंदुरबार, श्री. राजधर लखा माळी यांनी केलेला खुलासा समाधानकारक असल्याने मान्य करण्यात येऊन प्रस्तावित शास्तीची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

२) प्रस्तुत तक्रार अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

**(के. एल. बिश्नोई)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ नाशिक**

स्थळ :- नाशिक
दिनांक :- 21 OCT 2021

**प्रती,**

श्री. राजधर लखा माळी, (तत्कालीन जन माहिती अधिकारी), उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद कार्यालय, नंदुरबार, ता. जि. नंदुरबार.